महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम
ग्रामपंचायत निवडणूक आचारसंहितेच्या
कालावधीत कर्तव्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक तंमुगा-१००८/प्र.क्र. २२/पोल-१५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १४ नोव्हेंबर, २००७.

**वाचा**:- १) गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक एमआयएस १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९.७.२००७.
२) गृह विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक तंमुगा-१००८/प्र.क्र.२२/पोल-१५, दिनांक ३.९.२००७.

**शासन परिपत्रक**

शासन निर्णय, क्रमांक एमआयएस १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै, २००७ अन्वये "महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम" दिनांक १५.८.२००७ पासून राज्यात सुरु करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद-६.(३)(१) (अ) यामध्ये तंटामुक्त गाव समितीची रचना देण्यात आली असून सदर समितीत ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच हे पदसिध्द सदस्य आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडणूका/ पोटनिवडणूकांच्या आचारसंहितेच्या कालावधीत सरपंच व उपसरपंच यांनी तंटामुक्त गाव समितीच्या कामकाजात भाग घेणे अपेक्षित नाही असे संदर्भित दिनांक ३.९.२००७ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

२. या अनुषंगाने पुढे निदेश देण्यात येत आहेत की, जी गावे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमध्ये सहभागी झालेली आहेत आणि ज्या गावांमध्ये ग्रामपंचायतींच्या निवडणूकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाकडून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे, अशा गावांतील ग्रामपंचायतींच्या निवडणूकीच्या आचारसंहितेच्या कालावधीत संबंधीत गावांचे सरपंच व उपसरपंच यांच्याबरोबरच तंटामुक्त गाव समितीतील महाविद्यालय/माध्यमिक विद्यालय/प्राथमिक शाळामधील अध्यापकांचे प्रतिनिधी, वीज वितरक कंपनीचा प्रतिनिधी, विशेष पोलीस अधिकारी, बीट अंमलदार, ग्राम सेवक / ग्राम विकास अधिकारी, तलाठी हे शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थांचे अधिकारी/कर्मचारी तसेच पोलीस पाटील यांनी सुध्दा मोहिमेच्या कामकाजात भाग घेऊ नये.

३. ग्रामपंचायत निवडणूकीच्या आचारसंहितेच्या कालावधीत तंटामुक्त गाव समितीने, समितीच्या एका अशासकीय सदस्याची निमंत्रक म्हणून नियुक्ती करावी. अशा सदस्याने या कालावधीत तंटामुक्त गाव समितीचे निमंत्रक म्हणून कामकाज पहावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा.आ.गुट्टे

( मा.आ. गुट्टे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.